# युवाराष्ट्र दर्शन

RNI No. MAHMAR/2008/26657

E-mail : yuvarashtradarshan.com

नागपूर, रविवार, दिनांक ११ जानेवारी २०२६ ■ वर्ष १७ ■ अंक ३१९ ■ पाने ८ ■ किंमत रु. २/- +वितरण खर्च रु.१ = एकूण ३ रुपये


## लंडनहून मुंबईत येताच डॉ. पाटील पोलिसांच्या ताब्यात





**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १०**

लंडनस्थित डॉ. संग्राम पाटील यांना आज मुंबई पोलिसांनी विमानतळावरून ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. पोलिसांनी केलेल्या या कारवाईनंतर ॲड.असीम सरोदे यांनी फेसबुकवर पोस्ट शेअर करत संताप व्यक्त केला आहे.

माहितीनुसार, संग्राम पाटील यांनी सोशल मीडियावर मोदी सरकारच्या विरोधात आणि भारतीय जनता पक्षाच्या विरोधात लिखाण केल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला आहे. या प्रकरणात भाजपाच्या काही पदाधिकाऱ्यांनी त्यांच्याविरोधात तक्रार दाखल केली होती. त्यामुळे पोलिसांनी संग्राम पाटील यांना चौकशीसाठी ताब्यात घेतल्याचं सांगितलं जात आहे. मात्र, चौकशीनंतर सोडून देण्यात आल्याचं संग्राम पाटील यांनी प्रतिक्रिया देताना म्हटलं आहे. तसेच या प्रकरणात आपण कायदेशीर मार्गाने पुढे जाणार असल्याचं संग्राम पाटील यांनी सांगितलं आहे.

मी फेसबुकवर लिहित असतो, त्यातील काही पोस्ट सरकारच्या लोकांना आवडल्या नाहीत. त्यामुळे त्यांनी तक्रार करत एफआयआर दाखल केला होता. त्यामुळे पोलिसांनी मला ताब्यात घेतलं होतं. आज दिवसभर चौकशी करून आता मला नोटीस दिली आणि आता पुढील तपास सुरू झाला आहे. कोणत्यातरी एका राजकीय ग्रूपची एक पोस्ट आहे आणि त्याबरोबर मला क्लब करून टाकलं आहे. मात्र, यावर मी आता जास्त काही बोलणार नाही. चौकशीतून योग्य ते समोर येईल'', असं संग्राम पाटील यांनी टिव्ही ९ मराठी या वृत्तवाहिनीशी प्रतिक्रिया देताना म्हटलं आहे.

# सोलापूर शहराचा सर्वांगीण विकास करू : मुख्यमंत्री

**वृत्तसंस्था**
**सोलापूर, दि. १०**

जिथे विमानसेवा होऊ शकते ही कल्पनेपलीकडची गोष्ट होती तिथे आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासाच्या दूरदृष्टीतून विमानतळच उभे राहिलेलले नाही तर येथे नाइट लॅंडिंग सुरू करण्यावरही आम्ही भर देणार आहोत. येथे वंदे भारत ट्रेन सोबतच नाशिक, सोलापूर अक्कलकोट हा महामार्ग सुरू करून सोलापूर शहर जगातील दहा बंदरांपैकी एक असलेल्या वाढवण बंदराशी जोडल्या जात आहे. बंदराच्या माध्यमातून होणारा विकास गावोगावी पोहोचावा म्हणून रस्त्यांचे जाळे विणल्या जात आहे. या दळणवळणाच्या साधनातून औद्योगिक इकोसिस्टीम उभी करून सोलापूर उद्योग नगरी लवकरच भरभराटीला येईल असा विश्वास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूरच्या प्रचार सभेत व्यक्त केला.



राज्यातील महानगरपालिकांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने देवेंद्र फडणवीस यांची प्रचारसभा सोलापूर येथे आयोजित केली होती. या प्रचार सभेत देवेंद्र फडणवीस म्हणाले की बहुभाषिक, बहुसांस्कृतिक, स्वाभिमानी लोकांची ही नगरी तेथील हातमाग, यंत्रमाग, विणकर, बिडी कामगार, शेती यांच्यासाठी ओळखली जाते. पण या शहराला आधुनिक शहराची ओळख देखील मिळवून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.या अनुषंगाने ते म्हणाले की, अन्न,वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य आणि रोजगार यासाठी खेड्यातील माणूस हा शहरात येत असतो. वाढत्या लोकसंख्येमुळे आणि शहरीकरणामुळे झोपडपट्ट्या, पिण्याच्या पाण्याची अनास्था, घनकचरा, सांडपाणी, रोगराई अशा समस्या उद्भवतात. तेव्हा शहरातील सामान्य गरीब मध्यमवर्ग याच्या जीवनामध्ये परिवर्तन व्हायचे असेल तर शहराचा विकास झाला पाहिजे. गेल्या ७० वर्षापासून विकासापासून दूर असलेल्या शहरांच्या नियोजनासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्मार्ट सिटी, अमृत शहर योजना, स्वच्छ भारत शहरी योजना, प्रधानमंत्री आवास योजना, शहरी योजना यांच्या माध्यमातून कोटींचा निधी शहरांसाठी उपलब्ध करून दिला आहे. आणि यातूनच महाराष्ट्रातील शहरांचा विकास साधल्या जात आहे.

सोलापूर शहरातील उद्योगांना नवीन उभारी मिळावी आणि जगातील उद्योग येथे पोहोचावे म्हणून येथे विमान सेवा सुरू करण्यात आली आहे. विमानसेवा हे श्रीमंतांचे लक्षण नसून सामान्य माणसाच्या विकासाची आणि त्याच्या भरभराटीचे साधन आहे आणि हीच दूरदृष्टी ठेवत नाशिक, सोलापूर, अक्कलकोट हा महामार्ग सुरू करून हे शहर जगातील १० बंदरांपैकी एक असलेल्या वाढवण बंदराला जोडल्या जात आहे.

या बंदराच्या माध्यमातून होणारा विकास गावोगावी पोहोचावा म्हणून रस्त्यांचे जाळे विणून इकोसिस्टम उभी केली जाणार आहे. यातून सोलापूर शहराची औद्योगिक औद्योगिक भरभराट होणार आहे. हा विकास पाहिजे असेल तर आमच्या हातात सत्ता द्या असे त्यांनी सोलापूरकरांना आवाहन केले.

## मेफेड्रोन तस्करांवर मोका

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ९**

मेफेड्रोनची तस्करी करणाऱ्या चौघांवर महाराष्ट्र गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोका) अन्वये कारवाई करण्यात आली.

समीर सगीर अहमद (३०) कमल कॉलनी, कामगारनगर, इमरान सगीर अहमद (२८) कामगारनगर, आकाश भागीरथ सयाम (२६) भीमवाडी झोपडपट्टी, पिवळी नदी आणि इमरान उर्फ सोनू उर्फ बंदर सत्तार शेख (२६) कामगारनगर अशी या तस्करांची नावे आहेत. इमरान उर्फ सोनू हा अजूनपर्यंत पोलिसांच्या हाती लागला नाही.

२९ नोव्हेंबर रोजी रात्रीच्या वेळी आरोपी हे मेफेड्रोनची खेप घेऊन कामगारनगरात आले होते. कामगारनगरात मोठ्या प्रमाणात मेफेड्रोनची डिल होणार असल्याची माहिती खबऱ्याने कपिलनगर पोलिसांना दिली होती.

# फडणवीसांना खोट्या गुन्ह्यात अडकवण्याचा कट!

## स्टिंग ऑपरेशनमधून थरारक खुलासा

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १०**

राज्यात महापालिका निवडणुकांच्या रणधुमाळीत प्रचार शिगेला पोहोचलेला असतानाच, महाराष्ट्राच्या राजकारणाला हादरवून टाकणारा एक स्फोटक दावा समोर आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना खोट्या गुन्ह्यात अडकवण्याचा सुनियोजित कट रचण्यात आल्याचा धक्कादायक खुलासा स्टिंग ऑपरेशनमधून झाला असून, त्यासंबंधीचा सविस्तर अहवाल थेट राज्याच्या गृहविभागाकडे सादर करण्यात आला आहे. ऐन निवडणुकांच्या तोंडावर समोर आलेल्या या प्रकरणामुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.



काही दिवसांपूर्वी माध्यमांमध्ये एक खळबळजनक बातमी प्रसिद्ध केली होती. महाविकास आघाडी सरकारच्या काळात तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस आणि त्या वेळचे मंत्री एकनाथ शिंदे यांना खोट्या गुन्ह्यात अडकवण्याचं षडयंत्र शिजत असल्याचा दावा या बातमीत करण्यात आला होता. तेव्हा विरोधकांनी या वृत्तावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते; मात्र आता या आरोपांवर अधिकृत शिक्कामोर्तब झाल्याचं चित्र आहे.

महाराष्ट्राच्या निवृत्त पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी राज्य गृह विभागाला सादर केलेल्या विशेष चौकशी अहवालात हा गंभीर दावा करण्यात आला आहे. २०१६ च्या कथित घोटाळ्याच्या नावाखाली देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांना अडकवण्याचा कट रचण्यात आल्याचे या अहवालात नमूद आहे.

या कटाचा सूत्रधार म्हणून मुंबईचे माजी पोलीस महासंचालक संजय पांडे यांचे नाव पुढे आले आहे. हा दावा समोर येताच प्रशासन, राजकारण आणि पोलीस दलात प्रचंड खळबळ माजली आहे.

महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हे प्रकरण समोर आल्याने राजकीय आरोप-प्रत्यारोपांची नवी फेरी सुरू होण्याची चिन्हे आहेत. सत्ताधारी आणि विरोधक आमनेसामने येण्याची शक्यता असून, ''राजकीय सूडबुद्धीने राज्यातील सर्वोच्च नेत्यांना लक्ष्य केलं गेलं का?'' हा प्रश्न आता खुलेआम विचारला जात आहे.

या स्फोटक खुलाशामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात नव्या वादळाची चाहूल लागली असून, पुढील काही दिवसांत हे प्रकरण निवडणूक प्रचाराच्या केंद्रस्थानी राहणार, हे निश्चित मानले जात आहे.

### अहवाल आणि स्टिंग ऑपरेशन

या गंभीर आरोपांची चौकशी करण्यासाठी पोलीस सहआयुक्त सत्यनारायण चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले होते. या समितीत तत्कालीन डीआयजी राजीव जैन, डीसीपी नवनाथ ढवळे आणि एसीपी जादिकराव पोळ यांचा समावेश होता.

या समितीने मुंबई उच्च न्यायालयात एक पेन ड्राइव्ह सादर केली असून, त्यामध्ये स्टिंग ऑपरेशनचे तपशील असल्याचा दावा करण्यात आला आहे. या स्टिंगमध्ये फडणवीस आणि शिंदे यांना खोट्या गुन्ह्यात अडकवण्यासाठी रचलेल्या डावपेचांचा उल्लेख असल्याचे सांगण्यात येते.

## जागेच्या वादातून इसमाची हत्या

**नागपूर, दि. १०**

जागेच्या वादातून एका इसमाचा खून केल्याची घटना जरीपटका हद्दीत लुंबिनीनगर येथे उघडकीस आली.

मंगेश भीमराव भिमटे (४२) असे मृतकाचे नाव आहे. मृतक मंगेश भिमटे यांच्या घराशेजारी रमेश गेडाम यांचे घर आहे. गेडामच्या शेजारीच आरोपी कुणाल उर्फ गोलू विद्याधर कांबळे (४५) याचे घर आहे. रमेश गेडाम आणि त्याच्या भावात घरावरून वाद सुरू असून प्रकरण न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे. गेडाम यांचे घर खरेदी करण्यासाठी गोलूने एक ग्राहक आणला होता. ग्राहकाने गेडामचे घर खरेदी केले होते. रमेश गेडाम यास न्यायालयीन कामकाजात मृतक मंगेश हे मदत करतात असा समज गोलूचा होता. त्यावरून तो त्यांचा राग करीत होता.

शुक्रवारी रात्री ११ च्या सुमारास मंगेश बाहेरून घरी येत होते. घराजवळच गोलूने त्यांच्यावर तीक्ष्ण शस्त्राने हल्ला केला.

# पूर्व नागपुरात भाजपमध्ये पक्षांतर्गत नाराजी

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १०**

गेल्या काही विधानसभा आणि महापालिका निवडणुकांत वाढता ग्राफ असलेल्या पूर्व नागपूर विधानसभा मतदारसंघात यावेळी भाजप कार्यकर्त्यांमध्ये उमेदवारीवरून प्रचंड नाराजी आहे. खुद्द स्थानिक आमदाराच्या मुलास उमेदवारी न मिळाल्याने खदखदीची तीव्रता अधिक वाढली आहे. तर काँग्रेसने पक्षातील बंडखोरांना रोखण्यात काही प्रमाणात यश मिळवले आहे. त्यामुळे काँग्रेसला येथे भरीव यशाची आशा आहे.

पूर्व नागपूरमध्ये भाजप आणि काँग्रेस यांच्यातील थेट लढतीचे चित्र आहे. भाजपचे प्राबल्य असलेल्या या मतदारसंघात यावेळी उमेदवारी वाटपामुळे पक्षांतर्गत नाराजी उफाळून आली आहे. विशेषतः आमदार कृष्णा खोपडे यांच्या मुलाला प्रभाग क्रमांक २१ मधून उमेदवारी नाकारण्यात आल्याने स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये असंतोष आहे. काँग्रेसचे माजी मंत्री सतीश चतुर्वेदी प्रचारात सक्रिय असले तरी ही नाराजी भाजपसमोर मोठे आव्हान ठरत आहे.



दुसरीकडे, काँग्रेसने विधानपरिषद सदस्य ॲड. अभिजीत वंजारी यांच्या नेतृत्वाखाली पूर्व नागपूरमध्ये संपूर्ण शक्ती झोकून दिली आहे. माजी मंत्री सतीश चतुर्वेदी आणि वरिष्ठ पदाधिकाऱ्यांची साथ मिळत असली तरी काही प्रभागांत उमेदवारीवरून नाराजी आहे. मात्र, विधानसभा निवडणुकीतील बंडखोरी करणाऱ्या पुरुषोत्तम हजारे यांना अर्ज मागे घेण्यास प्रवृत्त करण्यात काँग्रेसला यश आल्याने काँग्रेस मतांचे विभाजन टळले आहे.

पूर्व नागपूरमध्ये महापालिकेचे दहा प्रभाग आहेत. त्यापैकी प्रभाग क्रमांक २१, २३, २४, २५, २६ आणि २७ हे पूर्णतः पूर्व नागपुरात येतात. तर प्रभाग क्रमांक ४ मधील दोन, वॉर्ड क्रमांक ५, २२ आणि २८ मधील प्रत्येकी एक असे एकूण पाच नगरसेवक पूर्व नागपूरशी संबंधित आहेत. २०१७ च्या निवडणुकीत याच मतदारसंघातून भाजपने २९ पैकी २४ जागा जिंकून वर्चस्व सिद्ध केले होते. मात्र, यावेळी भाजपमधील अंतर्गत नाराजीमुळे निकाल अनपेक्षित ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

प्रभाग क्रमांक २१ मध्ये प्रेमनगर, सतरंजीपुरा आणि शांतीनगरचा समावेश असून येथे भाजप आणि काँग्रेसमध्ये चुरशीची लढत आहे. काँग्रेसने येथे आमदार कृष्णा खोपडे यांच्या नातेवाईकाला उमेदवारी देत राजकीय समीकरणे बदलण्याचा प्रयत्न केला आहे. प्रभाग क्रमांक २३ मध्ये भाजपचे माजी नगरसेवक बाल्या बोरकर आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार)चे शहराध्यक्ष दुनेश्वर पेठे यांच्यात थेट लढत होत आहे. दुनेश्वर पेठे यांनी विधानसभा निवडणुकीत ४८ हजार १०२ मते मिळवली होती हे येथे उल्लेखनीय. प्रभाग क्रमांक २४ मध्ये काँग्रेसचे चिंटू महाराज यांनी भाजपचे माजी नगरसेवक प्रदीप पोहणे यांच्याविरोधात आव्हान उभे केले आहे. प्रभाग क्रमांक २५ मध्ये पारडी, पुनापूर, भांडेवाडी परिसरात काँग्रेसचे श्रीकांत कैकाडे आणि भाजपचे राजेश्वर दिवटे यांच्यात लढत होत आहे. प्रभाग क्रमांक २७ मध्ये नंदनवन, नेहरूनगर, भांडे प्लॉट, हसनबाग आणि ओमनगरचा समावेश आहे. येथे काँग्रेसचे प्रशांत धवड, भाजपचे प्रवीण गिऱ्हे आणि अजित पवार गटाचे तानाजी वनवे यांच्यात तिरंगी लढत होत आहे.

# २४ तासांतच भाजपची माघार!

## बाल अत्याचार प्रकरणातील सहआरोपीला नगरसेवकपद

### जनआक्रोश पाहताच आपटेंचा राजीनामा

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १०**

बदलापूरच्या राजकारणात जे घडलं ते थेट जनतेच्या रोषाचं उदाहरण ठरलं. बाल लैंगिक अत्याचार प्रकरणातील सहआरोपी असलेल्या तुषार आपटे यांना भाजपने स्वीकृत नगरसेवक म्हणून नेमताच, अवघ्या काही तासांत संताप उसळला आणि २४ तासांच्या आतच भाजपला माघार घ्यावी लागली. दबाव एवढा वाढला की आपटेंनी पदाला रामराम ठोकला.

भाजपने आपटेंची कुळगाव-बदलापूर नगरपरिषद येथे स्वीकृत नगरसेवक म्हणून घोषणा केली. घोषणा होताच प्रश्नांचा भडिमार सुरू झाला.

हा थेट सवाल रस्त्यावर, सोशल मीडियावर आणि सभागृहात घुमू लागला. विरोधकांनी चढाओढीने टीका केली; सामान्य नागरिकांनीही नाराजी उघड व्यक्त केली.

या निर्णयामुळे भाजपची प्रतिमा धोक्यात येणार, हे लक्षात येताच वरिष्ठांनी तातडीने हस्तक्षेप केला. चर्चेनुसार, निवडणुकीत केलेल्या कामाचं बक्षीस म्हणून ही नियुक्ती झाली होती. मात्र तीच नियुक्ती भाजपसाठी डोकेदुखी ठरली. अखेर, राजकीय नुकसान वाढू नये म्हणून २४ तासांतच आपटेंचा राजीनामा स्वीकारण्यात आला.ऑगस्ट २०२४ मध्ये बदलापूरमधील एका नामांकित शाळेत घडलेली घटना राज्याला हादरवणारी होती. चार वर्षांच्या दोन चिमुकल्यांवर सफाई कर्मचाऱ्याने लैंगिक अत्याचार केला. वैद्यकीय अहवालात एका मुलीच्या गुप्तांगाला गंभीर दुखापत झाल्याचं स्पष्ट झालं. १६ ऑगस्टला पीडित कुटुंबीय अहवाल घेऊन शाळेत गेले; मात्र आरोप फेटाळले गेले, असा दावा झाला. तब्बल ११ तासांनी पोलिसांनी सफाई कर्मचारी अक्षय शिंदे याच्यावर गुन्हा दाखल केला. पुढील चौकशीत शाळा व्यवस्थापनातील सदस्यांवरही गुन्हे नोंदले गेलेत्यात सचिव तुषार आपटे यांचाही समावेश होता.

राजीनामा झाला, पण उत्तरं नाहीत. ही माघार खरंच आत्मपरीक्षणाची सुरुवात आहे का, की फक्त डॅमेज कंट्रोलहे येणारा काळ ठरवेल. बदलापूर प्रकरणातील न्यायाची लढाई अजून संपलेली नाही; मात्र या घटनेने राजकारण, नैतिकता आणि सार्वजनिक जबाबदारी यांमधील ताणतणाव पुन्हा एकदा उघड्यावर आणला आहे.

### राजकारण विरुद्ध नैतिकताटकराव उघड

निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय बक्षीस देताना नैतिकतेचा विसर पडला का, हा सवाल आता थेट भाजपसमोर आहे. इतक्या संवेदनशील प्रकरणातील सहआरोपीला लोकप्रतिनिधी बनवण्याचा विचार झाला तरी कसाहा प्रश्न जनतेच्या मनात ठसठसत आहे.

# मुंबई महाराष्ट्राची नाही?

## निवडणुकीआडून ओळख पुसण्याचा डाव

### अण्णामलाईंच्या विधानाने रण पेटलं

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १०**

मुंबई महापालिकेच्या निवडणुका तोंडावर असताना भाजपने प्रचारासाठी बाहेरच्या राज्यांतील नेत्यांची फौज उतरवली आणि त्याच क्षणी मुंबईच्या अस्मितेशी थेट खेळ सुरू झाला. उत्तर प्रदेश, बिहारनंतर थेट तामीळनाडू भाजपचे अध्यक्ष के. अण्णामलाई मुंबईत अवतरले. वॉर्ड क्रमांक ४७ मधील प्रचारात त्यांनी जे उच्चारले, त्याने केवळ राजकीय तापमान वाढवले नाही, तर मराठी अस्मितेवर उघड हल्लाच चढवला.

एका मुलाखतीत अण्णामलाई यांनी मुंबईचा उल्लेख ''बॉम्बे'' असा करत थेट विधान ठोकले''बॉम्बे इज नॉट महाराष्ट्र सिटी.'' पुढे त्यांनी मुंबई हे महाराष्ट्रातील शहरच नाही, तर एक आंतरराष्ट्रीय शहर असल्याचा दावा केला. हा केवळ शब्दांचा घोळ नव्हता; तर राज्याच्या इतिहासाला, लढ्यांना आणि बलिदानांना नाकारण्याचा प्रयत्न असल्याची भावना सर्वत्र पसरली. इतक्यावरच न थांबता, अण्णामलाईंनी ''ट्रिपल इंजिन सरकार''चा राजकीय नारा दिला. केंद्रात मोदी, राज्यात देवेंद्र फडणवीस आणि बृहन्मुंबई महानगरपालिका मध्ये भाजपचा महापौरअशी सत्तेची मांडणी करत त्यांनी चेन्नई, बंगळुरू, हैद्राबादची उदाहरणे दिली. मात्र, सत्तेच्या या गणितात मुंबईचा आत्मा कुठे आहे, असा सवाल मराठी जनतेने उपस्थित केला. या वक्तव्याने शिवसेना आक्रमक झाली. ''शेवटी पोटातले ओठांवर आलेच,'' असा थेट आरोप करत शिवसेनेचे राज्य संघटक अखिल चित्रे यांनी भाजपवर तोफ डागली.



## कारागिरांनी सराफाला गंडविले

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १०**

जास्त भावात सोने विकून देतो अशी बतावणी करीत दोन कारागिरांनी एका सराफाची १४ लाखांनी फसवणूक केली.

लाडीकर ले आऊट येथील गोपाल चित्रीव (४५) यांचे घरी सोन्याचांदीचे दुकान आहे. कामानिमित्त ते सराफा ओळीत जात असत. त्यामुळे त्यांची ओळख शाहरूख मुजीब अंसारी (३२) सतरंजीपुरा आणि सूरज (३२) बुटीबोरी यांच्याशी झाली. त्यावेळी माझ्याकडे सोन्याचे सिक्के आहेत असे दोघाही आरोपींना सांगितले. सोन्याचे सिक्के जास्त दरात विकून देतो अशी बतावणी केली. चित्रीव यांनी दोघांवरही विश्वास ठेवून त्यांना १४ लाखांचे १६० ग्रॅम वजनाचे सोन्याचे सिक्के दिली.

# यात्रेकरूंची ५७.३० लाखांनी फसवणूक

**नागपूर, दि. १०**

यात्रेकरूंची ५७ लाख ३० हजाराने फसवणूक केल्याप्रकरणी तहसील पोलिसांनी मक्का मदिना आणि उमराहच्या यात्रेला नेतो अशी बतवणी करून ६५ लोकांची ५७ लाख २३ हजाराने फसवणूक केल्याप्रकरणी तहसील पोलिसांनी एका महिलेसह ५ जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

मो. एजाज अहमद याची टिमकी, मोमीनपुरा येथे एम. एम. हज ॲण्ड उमराह टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स नावाची कंपनी आहे. तो त्याच्या ट्रॅव्हल्स कंपनीमार्फत लोकांना मक्का मदिना आणि हज यात्रेला पाठवित होता. शौकत अली चौक, हज हाऊसमागे, गणेशपेठ येथे राहणारे अशरफ अली आबिद अली (३०) यांनाही हज यात्रेला जायचे होते. त्यामुळे त्यांनी मो. एजाजशी संपर्क केला. त्यांनी पैसे भरले आणि पासपोर्ट जमा केला. एजाजसोबतच अन्य ६५ लोकांनी देखील एजाज यास पैसे दिले होते. ६ जानेवारीला त्यांना यात्रेला जायचे होते. परंतु, एजाजने त्यांना यात्रेला नेलेच नाही. त्यानंतर तो बेपत्ता झाला. अशरफ अली आणि इतरांनी त्याचा शोध घेतला असता त्याचे कार्यालय देखील बंद होते. याप्रकरणी अशरफ अली यांनी गणेशपेठ पोलिसात तक्रार केली. या तक्रारीवरून पोलिसांनी मो. एजाज, मदिहा आबिश अंसारी, मो. साफ एजाज अंसारी, एजाजची पत्नी आणि सय्यद इजहार पटेल यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवून एका आरोपीला अटक केली.

# बदनामी करणे सोडा, मातोश्रीचे दार आपोआप उघडेल : ठाकरे

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १०**

राज्यात महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घडामोडींना वेग आल्याचं पाहायला मिळत आहे. सध्या महापालिका निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू असून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. एवढंच नाही तर महायुतीमधील नेतेही एकमेकांच्या विरोधात टीका करताना दिसत आहेत. असं असतानाच माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी एक मोठं वक्तव्य केलं आहे.



दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका मुलाखतीत बोलताना आपल्यासाठी उद्धव ठाकरे यांनी 'मातोश्री'चे दरवाजे बंद केल्याचं भाष्य केलं होतं. त्यावर आता उद्धव ठाकरे यांनी भाष्य केलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी'मातोश्री'चे दरवाजे बंद आहेत का? याबाबत विचारलं असता उद्धव ठाकरे यांनी सूचक भाष्य केलं. 'मातोश्रीवरील टीका करणं बंद करा, तर मातोश्रीचे दरवाजे उघडतील', असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं. ते टिव्ही ९ मराठी या वृत्तवाहिनीशी बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काल एका मुलाखतीत बोलताना म्हणाले की, महापालिका निवडणुकीनंतर राज ठाकरे यांनी जर मला चहा प्यायला बोलावलं तर मी जाईन किंवा ते माझ्या घरी येतील. मात्र, उद्धव ठाकरेंनी 'मातोश्री'चे दरवाजे माझ्यासाठी २०१९ मध्येच बंद केले आहेत, असं फडणवीस यांनी म्हटल्याबाबतचा प्रश्न उद्धव ठाकरे यांना विचारण्यात आला.

या प्रश्नावर उत्तर देताना उद्धव ठाकरे म्हणाले की, असं अजिबात झालेलं नाही. एवढी माणुसकी विसरणारा मी नाही. मात्र, तुम्ही मातोश्री बदनाम करण्यासाठी निघाला आहात. तुम्ही मातोश्रीवर वाट्टेल ते आरोप करता. ते तोंड तुम्ही बंद करा, मग 'मातोश्री'चे दरवाजे उघडतील, असं मोठं वक्तव्य उद्धव ठाकरे यांनी केलं आहे. मातोश्री'चे दरवाजे उघडतील हे मी एवढ्यासाठीच म्हणत आहे की त्यांनी बकवास करणं बंद करावं. मातोश्रीला बदनाम करण्याचं काम बंद करावं.

### भाजपाने एक मित्र गमावला

मातोश्रीमध्ये येऊन अमित शाह यांनी जो शब्द दिला होता, जो शब्द त्यांनी नंतर मोडला, त्या मातोश्रीबाबत आता तुम्ही बोलता? तेव्हा मी काय मागितलं होतं? मला काही मागितलं नव्हत, मी शिवसेनेसाठी मागितलं होतं, कारण मी बाळासाहेब ठाकरे यांना वचन दिलं होतं. मात्र, तेच तुम्ही नंतर गद्दारी करून घेतलं. मग त्यांनी शिंदेंना मुख्यमंत्री केलं, शेवटी काय मिळवलं? भाजपाने एक मित्र गमावला, असंही उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

# ठाकरे बंधूंच्या सभेला कोर्टाचा ब्रेक?

## ध्वनी प्रदूषणचा मुद्दा घेऊन सदावर्तेंची थेट न्यायालयात धडक

**मुंबई, दि. १०**

मुंबई महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकारण तापलेले असतानाच, शिवतीर्थावरील ठाकरे बंधूंच्या ऐतिहासिक सभेआधीच नवा वाद पेटला आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या संयुक्त सभेविरोधात ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी थेट न्यायालयात जाण्याचा इशारा दिल्याने राजकीय वातावरणात खळबळ उडाली आहे. मी मुंबईचा एक मतदार आहे, म्हणूनच बोलतो, असं ठणकावत सदावर्तेंनी ठाकरे बंधूंवर थेट आरोपांची झोड उठवली. कायद्याबाह्य वर्तन करणारेच दुसऱ्यांना कायदा शिकवतात, असा बोचरा टोला लगावत त्यांनी ११ जानेवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज पार्क (शिवतीर्थ) येथे होणाऱ्या संयुक्त सभेविरोधात तक्रार केल्याचे जाहीर केले.

राज ठाकरे पर्यावरणप्रेमी असल्याचे सांगतात, पण ''एक बोट दुसऱ्याकडे दाखवताना चार बोटे स्वतःकडे वळलेली असतात,'' असा घणाघात करत सदावर्तेंनी सभांमुळे होणाऱ्या ध्वनी प्रदूषणावर बोट ठेवले. उच्च न्यायालयाच्या एका निकालाचा हवाला देत, ''त्या ठिकाणी राजकीय पक्षांना हक्काने सभा घेण्याचा अधिकार दिलेला नाही. तरीही सभा घेतली जात असल्याने हा न्यायालयाचा अवमान आहे,'' असा गंभीर आरोप त्यांनी केला.

माझं म्हणणं स्पष्ट आहेकायदा पाळलाच पाहिजे. ठाकरे बंधू असोत किंवा अन्य कोणताही पक्ष, असं सांगत सदावर्तेंनी या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्याची माहिती दिली. ''त्यांना जे काही सांगायचं आहे ते कोर्टात सांगतील,'' असंही त्यांनी स्पष्ट केलं.

## जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज आमंत्रित

युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.१० :** क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे खेळाडू व क्रीडा मार्गदर्शक यांच्या कार्याचा गौरव व्हावा व त्यांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने दरवर्षी महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणेच्या वतीने जिल्ह्यातील तीन सर्वोत्कृष्ट गुणवंत खेळाडू (महिला, पुरुष व दिव्यांग) व एक गुणवंत क्रीडा मार्गदर्शकाला पुरस्कार दिले जातात.

त्या अनुषंगाने सन २०२४-२५ करिता चंद्रपूर जिल्ह्यातील खेळाडू, व क्रीडा मार्गदर्शक यांच्याकडून जिल्हा क्रीडा पुरस्काराकरिता अर्ज मागविण्यात येत आहे. सदर अर्ज १२ जानेवारी २०२६ पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे क्रीडा अधिकारी मोरेश्वर गायकवाड यांच्याकडे उपलब्ध आहे. तसेच हे अर्ज १२ जानेवारी २०२६ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावे. उशीरा येणारे अर्ज स्वीकारले जाणार नाही.अर्ज सादर करताना अर्जदाराचे महाराष्ट्रात सलग १५ वर्ष वास्तव्य असणे आवश्यक आहे. तसेच क्रीडा मार्गदर्शक म्हणून सतत १० वर्ष महाराष्ट्रात क्रीडा मार्गदर्शनाचे कार्य केले असले पाहिजे व त्यांनी वयाची ३५ वर्ष पुर्ण केलेली असणे आवश्यक आहे. खेळाडूने पुरस्कार वर्षासह लगतपूर्व ५ वर्षापैकी २ वर्ष त्या जिल्ह्याच्या मान्यता प्राप्त खेळाच्या अधिकृत खेळामध्ये प्रतिनिधीत्व केले असले पाहिजे. तसेच अर्ज करीत असतांना शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासननिर्णय दि. १४ डिसेंबर २०२२ च्या जिल्हा क्रीडा पुरस्कार नियमातील अटी व शर्तींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

# चंद्रपूर महानगरपालिका निवडणुकीसाठी मतदान यंत्र सज्ज

## आयुक्तांच्या उपस्थितीत पार पडली मशीन तयार करण्याची प्रक्रिया



युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.१० :** चंद्रपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ साठी १५ जानेवारी रोजी सकाळी ०७:३० ते सायंकाळी ०५:३० वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या अनुषंगाने चंद्रपूर महानगरपालिका मतदारसंघात मशीन तयार करण्याची प्रक्रिया मनपा झोन क्रमांक ३ कार्यालयात १० जानेवारी रोजी घेण्यात आली.

सदर प्रक्रियेसाठी उमेदवार तसेच विविध राजकीय पक्षांचे अधिकृत प्रतिनिधी यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यांच्या उपस्थितीत मतदानासाठी वापरण्यात येणाऱ्या ईव्हीएम यंत्रांची तपासणी, बॅलेट युनिट व कंट्रोल युनिटची जुळणी, सीलिंग तसेच तांत्रिक चाचणी करण्यात आली. या प्रक्रियेचा मुख्य उद्देश मतदान यंत्रे पूर्णतः कार्यक्षम, सुरक्षित व त्रुटीविरहित असल्याची खात्री करणे, तसेच निवडणूक प्रक्रियेबाबत पारदर्शकता व विश्वास निर्माण करणे हा आहे. संपूर्ण प्रक्रिया राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, पारदर्शक व नियमानुसार पार पाडण्यात आली.

चंद्रपूर महानगरपालिका मतदारसंघात एकूण ३५५ मतदान केंद्र आहेत. यासाठी १५५० बॅलेट युनिट, ७२० कंट्रोल युनीट उपलब्ध आहेत. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्याकरिता निवडणूक विभागामार्फत विविध कार्ये केली जात आहेत. यात निवडणूक कर्तव्यावर नियुक्त केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकरिता टपाली मतपत्रिका उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्याकरिता सुविधा केंद्र ९,१०,११ व १२ जानेवारी रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत प्रत्येक निवडून निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात ठेवण्यात आले आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मतदारांना मतदान स्लिप ब्लॉक लेव्हल अधिकाऱ्यांमार्फत पोहोचेल याची खातरजमा करण्यात येत आहे. मतदारसंघ क्षेत्रात सकाळ व संध्याकाळ मिळुन १६ स्थीर निगराणी स्थळे ठेवण्यात आली असून त्यांचे मार्फत २४ बाय ७ वाहनांची कसून तपासणी करण्यात येत आहे. मतदान केंद्रावर मतदान यंत्रे पोहचविणे व परत आणणाऱ्या प्रत्येक वाहनावर जीपीएस यंत्रणा लावण्यात येणार आहे. मतदान झाल्यानंतर मतदान केंद्रावरून मतदान यंत्र परत महानगरपालिका मतदार संघाकरीता असलेल्या सुरक्षा कक्षात ठेवण्यात येईल. ईव्हीएम यंत्र तयार करण्याची प्रक्रिया ही उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींसमोर केली जाते. यात मतपत्रिका बॅलेट युनीटला लावून सील करणे, प्रत्येक उमेदवाराला मतदान करून बघणे (मॉक पोल), मतदान झाल्यानंतर डाटा जुळवून बघणे. त्यानंतर कंट्रोल युनीट, बॅलेट युनीट सील करून स्ट्रॉंग रुममध्ये ठेवण्यात येते. प्रत्यक्ष मतदानाच्या एक दिवस अगोदर मतदान पथकाला मशीनचे वाटप केले जाते.यावेळी निवडणूक अधिकारी तथा आयुक्त अकुनुरी नरेश, सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील,उपायुक्त संदीप चिद्रवार निवडणूक कर्मचारी तसेच निवडणुकीत उभे असलेले उमेदवार अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# 'मनरेगा बचाव' साठी काँग्रेसचे ग्रामीण व शहरी भागात सांकेतिक उपोषण

## पत्रपरिषदेत काँग्रेस जिल्हाध्यक्ष सुभाष धोटे यांची माहिती



युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.१० :** केंद्र सरकारने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) रद्द करून विकसीत भारत जी राम जी हा नवीन कायदा आणला असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे.या कायद्याला काँग्रेसचा तीव्र विरोध आहे. आणि आता 'मनरेगा बचाओ' या देशव्यापी मोहीमेतून काँग्रेस रस्त्यावर उतरून आंदोलन करणार आहे. ग्रामीण मजुरांचा सन्मान, रोजगार, मजुरी आणि वेळीच निधी देण्याच्या हक्कासाठी एकजुटीने संघर्ष करण्याचा संकल्प आहे.चंद्रपूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने उद्यापासून ग्रामीण व शहरी भागात सांकेतिक उपोषण करण्यात येणार असून चंद्रपूरमध्ये प्रियदर्शनी चौकात उपोषण करणार असल्याचे काँग्रेस जिल्हाध्यक्ष माजी आमदार सुभाष धोटे यांनी पत्रपरिषदेत सांगितले.


यावेळी काँग्रेस शहर अध्यक्ष संतोष लहामगे, विनायक बांगडे, विनोद दत्तात्रये, रितेश तिवारी, सुभाष गौर, दवे, अनिल नरुले व आदींची उपस्थिती होती.

मनरेगाच्या बदलांमुळे ग्रामीण भागातील गरिब, मजूर, शेतमजूर व बेरोजगार घटकांवर थेट अन्याय होत असून रोजगाराच्या हक्कावर गदा येत असल्याचा आरोप चंद्रपूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार सुभाष धोटे यांनी केला.

धोटे यांनी सांगितले की, मनरेगा ही केवळ रोजगार देणारी योजना नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. मात्र कामांची संख्या कमी करणे, मजुरी देयकांमध्ये विलंब, जॉबकार्ड व कामाच्या नोंदणीसंदर्भातील कठोर अटी, तसेच तांत्रिक प्रक्रियांमुळे मजुरांना काम मिळण्यात अडथळे निर्माण होत आहेत. परिणामी अनेक कुटुंबांचे उदरनिर्वाहाचे साधन हिरावले जात असल्याचा दावा करण्यात आला.

जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये मजुरांनी कामाची मागणी करूनही त्यांना वेळेवर काम दिले जात नाही. ज्या ठिकाणी काम दिले जाते, तेथे मजुरी वेळेवर मिळत नसल्याने मजुरांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. हे बदल मागे न घेतल्यास ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतर वाढण्याची शक्यता असून त्याचे गंभीर सामाजिक परिणाम भोगावे लागतील, असा इशाराही देण्यात आला.काँग्रेसने केंद्र सरकारकडे मनरेगासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्याची, १०० दिवसांच्या रोजगाराची हमी प्रभावीपणे अंमलात आणण्याची आणि मजुरांना वेळेवर मजुरी देण्याची मागणी केली आहे.तसेच मनरेगामध्ये केलेले बदल तात्काळ मागे घ्यावेत अशी मागणी चंद्रपूर जिल्हा काँग्रेस कमिटीने केली आहे.

## गरजू महिलांना स्वावलंबी करण्याच्या उद्देशाने शिलाई मशीनचे वाटप



युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.१० :** खासदार प्रतिभाताई बाळूभाऊ धानोरकर यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत पिपरी, धानोरा व येरुर परिसरात गरजू महिलांना स्वावलंबी करण्याच्या उद्देशाने एकूण ५० शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या उपक्रमामुळे महिलांना घरबसल्या रोजगाराची संधी उपलब्ध होणार असून स्वयंरोजगाराच्या माध्यमातून त्या स्वतःच्या पायावर उभ्या राहू शकणार आहेत. शिलाई मशीनच्या सहाय्याने शिवणकाम, कपड्यांची दुरुस्ती आदी कामे करून महिलांना उत्पन्नाचा शाश्वत स्रोत उपलब्ध होणार आहे. परिणामी कुटुंबाच्या आर्थिक स्थितीतही सकारात्मक बदल घडून येण्यास मदत होणार आहे.

हा सामाजिक उपक्रम चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दिनेश दादापाटील चोखारे यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. त्यांच्या पुढाकारातून हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. शिलाई मशीन प्राप्त झाल्याने महिलांनी समाधान व आनंद व्यक्त करत आयोजकांचे आभार मानले.कार्यक्रमादरम्यान महिलांच्या सक्षमीकरणासाठी अशा प्रकारचे उपक्रम अधिक प्रमाणात राबविण्याची आवश्यकता असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे ही काळाची गरज असून अशा उपक्रमांमुळे समाजातील दुर्बल घटकांना आर्थिक व सामाजिक बळ मिळते, असेही यावेळी नमूद करण्यात आले.या कार्यक्रमाला काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे महासचिव सामाजिक कार्यकर्ते सचिन राजूरकर , कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक गणेश आवारी, सेवा सह संस्था पिंपरीचे उपाध्यक्ष अतुल मोहितकर, कुंडलिक अडबाले, कमलाकर निब्रड, गजानन खामनकर, विठ्ठल करमरकर, माया मुसळे, वर्षा निब्रड यांच्यासह स्थानिक नागरिकांची लक्षणीय उपस्थिती होती.खासदार प्रतिभाताई धानोरकर यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे समाजात सकारात्मक संदेश गेला असून सामाजिक बांधिलकी जपत केलेल्या या कार्याचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

## आचारसंहिता अंमलबजावणीसाठी ४१ देखरेख पथके कार्यरत

युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.१० :** चंद्रपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने निवडणूक आचारसंहिता काटेकोरपणे अंमलात आणण्यासाठी चंद्रपूर महानगरपालिका प्रशासन व निवडणूक यंत्रणेमार्फत ४१ विविध देखरेख पथके कार्यरत ठेवण्यात आली आहेत.निवडणूक प्रक्रियेदरम्यान कोणत्याही प्रकारचे आचारसंहितेचे उल्लंघन होऊ नये, तसेच बेकायदेशीर प्रचार, रोख रक्कम, मद्य, भेटवस्तू वितरण यांस प्रतिबंध घालण्यासाठी सकाळी ८ व संध्याकाळी ८ अशा एकूण १६ स्थायी निगराणी पथके नियुक्त करण्यात आली आहेत.

तसेच तक्रार प्राप्त होताच तत्काळ कारवाई करण्यासाठी सकाळी ५ व संध्याकाळी ५ अशी एकूण १० फिरती पथके कार्यरत असून, प्रचार सभा, मिरवणुका व इतर निवडणूक कार्यक्रमांचे चित्रीकरण करण्यासाठी सकाळी ५ व संध्याकाळी ५ अशी एकूण १० व्हिडिओ देखरेख पथके कार्यरत आहेत.या व्हिडिओ चित्रीकरणाच्या माध्यमातून संकलित करण्यात आलेल्या चित्रफितींचे परीक्षण करून आचारसंहिता उल्लंघनाची प्रकरणे निष्पन्न करण्यासाठी ५ व्हिडिओ परीक्षण पथके कार्यरत ठेवण्यात आली आहेत. नागरिकांनी कोणत्याही प्रकारचे निवडणूक आचारसंहिता उल्लंघन निदर्शनास आल्यास तत्काळ संबंधित पथक किंवा निवडणूक प्रशासनाकडे तक्रार नोंदवावी, असे आवाहन मनपा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## महिला जिल्हाप्रमुख योगिता लांडगे यांचा काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश

युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.१० :** जिल्ह्यातील वरोरा ग्रामीण भागात मोठा राजकीय भूकंप झाला असून शिवसेना शिंदे गटाला खिंडार पडले आहे. खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या नेतृत्वावर विश्वास दर्शवत शिवसेना शिंदे गटाच्या महिला जिल्हाप्रमुख योगिता बाळू लांडगे यांच्यासह जिल्हाभरातील असंख्य पदाधिकारी, सरपंच, उपसरपंच आणि कार्यकर्त्यांनी सत्ताधारी पक्षाची साथ सोडून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला.

खासदार प्रतिभा धानोरकर यांची जनहिताची ध्येयधोरनावर विश्वास ठेऊन हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या सोहळ्यात प्रामुख्याने खापरीचे उपसरपंच अमोल चौधरी, वडगाव आर्वीचे संदीप ढोबळे, उपसरपंच शेरनाताई पेटकर, माजी सरपंच तुळशीराम कारेकर यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य सीमा मेश्राम, तंटामुक्त अध्यक्ष कवडू पाल आणि मोठ्या संख्येने महिला कार्यकर्त्यांनी काँग्रेसचे तिरंगी उपरणे खांद्यावर घेऊन पक्षाशी बांधीलकी जाहीर केली.

## नागभीड ग्रामीण रुग्णालयास जिल्हाधिकाऱ्यांची भेट

युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.१० :** नागभीड तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयास आज जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी भेट देऊन रुग्णालयातील व्यवस्थापनाचा आढावा घेतला व संबंधितांना सूचना दिल्या. रुग्णांना दिल्या जाणाऱ्या आरोग्य सेवांचा दर्जा अधिक सक्षम करण्याबाबत त्यांनी आरोग्य यंत्रणेला मार्गदर्शन केले.

यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी नागभीड येथे सुरु असलेल्या १०० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाच्या नवीन इमारत बांधकामाची पाहणी केली. तसेच सार्वजनिक विश्रामगृह इमारत बांधकाम आणि तहसील कार्यालय नागभीडच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामस्थळास भेट देऊन कामाच्या प्रगतीचा आढावा घेतला. संबंधित कार्यकारी अभियंता व कंत्राटदारांना इमारतींचे बांधकाम गुणवत्तापूर्ण व ठरलेल्या मुदतीत पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या.

तसेच झुडपी जंगल निर्वाणीकरण प्रस्तावाच्या अनुषंगाने नागभीड येथील स्मशानभूमी गट क्रमांक १२७/१ व कब्रस्थान गट क्रमांक ७१ येथील जागांची पाहणी करण्यात आली.

## भाजपाच्या माजी नगरसेवकांना प्रभागातील नागरिकांचा सवाल - केलेले काम नेमके काय?

युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.१० :** महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभागांमध्ये राजकीय हालचालींना वेग आला असून भाजपाच्या माजी नगरसेवकांसमोर नागरिकांनी थेट प्रश्न उपस्थित करण्यास सुरुवात केली आहे. गेल्या कार्यकाळात प्रभागासाठी नेमके काय केले, कोणती विकासकामे झाली आणि कोणती कामे अपूर्ण राहिली, याची जाब विचारणी आता थेट प्रचारादरम्यान होताना दिसत आहे.नूकतेच प्रभाग ११ भानापेठ मध्ये भाजपाचे उमेदवार प्रचारासाठी आले असतांना नागरीकांनी त्यांना घेराव करुन जाब विचारल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे.प्रभागात रस्ते, नाल्यांची कामे, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, कचरा व्यवस्थापन, पथदिवे, सार्वजनिक स्वच्छता, उद्याने व सामुदायिक सुविधा यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर नागरिक नाराजी व्यक्त करत आहेत. पाच वर्षे संधी मिळाली असताना आमच्या प्रभागात फारसे बदल दिसले नाहीत, अशी भावना अनेक ठिकाणी व्यक्त होत आहे. काही प्रभागांमध्ये अर्धवट राहिलेली कामे, निकृष्ट दर्जाची विकासकामे आणि निधी वापरावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.प्रचारासाठी घरोघरी भेटी देताना माजी नगरसेवकांना नागरिकांच्या रोखठोक प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे. 'फक्त आश्वासने दिली गेली, प्रत्यक्ष काम कमी झाले,' असा आरोप काही नागरिक करत आहेत. यामुळे प्रचाराचा सूर बदलत असून उमेदवारांना आपल्या कार्यकाळातील कामांचा हिशेब देण्याची वेळ आली आहे.दरम्यान, भाजपाचे माजी नगरसेवक आपल्या बाजूने स्पष्टीकरण देताना प्रशासनातील अडचणी, निधीअभावी रखडलेली कामे आणि कोरोना काळातील मर्यादा पुढे करत आहेत. काही ठिकाणी झालेल्या रस्ते काँक्रिटीकरण, ड्रेनेज लाईन, पथदिवे व इतर विकासकामांची यादीही ते नागरिकांसमोर मांडत आहेत. मात्र, नागरिकांना केवळ आकडेवारी नव्हे तर प्रत्यक्ष परिणाम दिसावा, अशी अपेक्षा आहे.एकंदरीत, या निवडणुकीत 'केलेले काम' हा मुद्दा केंद्रस्थानी येत असून भाजपाच्या माजी नगरसेवकांसाठी ही कसोटीची वेळ ठरत आहे. नागरिकांचा थेट सवाल आणि बदलाची भावना पाहता आगामी निवडणुकीत याचा निकालावर किती परिणाम होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## लोकमान्य ज्ञानपीठच्या शिक्षक व विद्यार्थ्यांकडून वृद्धाश्रमाला धान्याची मदत



युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी

**भद्रावती दि.१० :** येथील लोकसेवा मंडळातर्फे संचालित लोकमान्य ज्ञानपीठच्या शिक्षक व विद्यार्थ्यांनी नवीन वर्षा निमित्य भद्रावती येथील वृद्धाश्रम आपणापन ओल्ड एज होम येथे नुकतीच भेट देऊन अन्नधन्याची मदत करून सामाजिक दायीत्वाचा परिचय दिला यावेडी सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी नवीन वर्ष कोणत्याही प्रकारे साजरा न करता त्या पैशाची योग्य ठिकाणी वापर करत बेघर वृद्धाची मदत करण्याचा निर्णय घेतला सर्व शिक्षक शिक्षिका व पालक वर्ग लोकमान्य ज्ञानपीठच्या प्राचार्य पूनम संजय ठावरी यांनी पुढाकार घेत या कार्यात सहभाग दर्शवीला त्याच सोबत विद्यार्थी यश ठाकरे, नैतिक कोल्हे, अर्पित मंचलवार, हर्षल खोकले, सोहम लाडके, हर्ष आडे, जोनासन पुल्लिंवार, रेवत नळे, ज्ञानाल टोंगे, स्पर्श देव, आदित्य राऊत, दक्ष लांडगे, निरवान नागराडे, रुद्राक्ष गुळघाने, शिवांश दुधानकार, स्वरूप. कंचलवार, साची पाटील, पियुष रणदिवे, दिशांत डहाकी, रीशिता नागपुरे, तृप्ती ठाकरे, अन्हाणं शेख, आदित्य धोतरे, हर्षल घोगरे, शिवण्या भोस्कर, शिवम क्षीरसागर, अंशरा शेख प्रणय मन्ने, जानवी कश्यब, श्रीलेश घोटकर, क्षितिज मसराम, श्रीया रामटेके सोम्या वैद्य.यांनी सहभाग दर्शवला त्याच सोबात तेथील रहिवासी वृद्धाची दिनचर्या जाऊन घेतली व त्या वृद्धाच्या समस्या जाणून घेत त्याच्याशी गायन स्पर्धा करत आपला वेळ घालवला त्यानां भेटवस्तू देत निरोप घेतला.

# मारोडा येथे ४७४ घरकुल लाभार्थ्यांना मोफत रेती वाटप

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत उपक्रम



युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.१० :** राज्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची सुरुवात १७ सप्टेंबर २०२५ रोजी करण्यात आली आहे. या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पंचायत समिती, मूल यांच्या वतीने ९ जानेवारी २०२६ रोजी ग्रामपंचायत मारोडा येथे ४७४ घरकुल लाभार्थ्यांना मोफत रेती वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

मारोडा येथील विश्वशांती विद्यालयाच्या पटांगणावर आयोजित या कार्यक्रमास आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रेती वाटपाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकीत सिंह, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मारोडाचे सरपंच भिकारुजी शेंडे तर प्रमुख अतिथी म्हणून संध्या गुरनूले, जिल्हा ग्रामीण यंत्रणेचे प्रकल्प संचालक मंजिरी टकले, घुगुस येथील लॉईड मेटल्सचे जनरल मॅनेजर विद्या पाल, गटविकास अधिकारी किशोर शिंदे यांच्यासह तालुकास्तरीय अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मारोडा हे गाव महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव कन्नमवार यांची कर्मभूमी असल्याचे नमूद करून, या गावातून घरकुल लाभार्थ्यांना मोफत रेती वाटप होत असल्याचा विशेष आनंद व्यक्त केला. शासनाच्या धोरणानुसार रेती मोफत असून वाहतुकीचा खर्च लाभार्थ्यांनी करावयाचा असतो; मात्र लॉयड मेटलच्या सीएसआर निधीतून मारोडा हे चंद्रपूर जिल्ह्यातील पहिले गाव ठरले असून, येथे लाभार्थ्यांना रेती घरपोच मिळणार आहे. तसेच प्रत्येक घरकुल लाभार्थ्यांच्या खात्यात वाहतुकीसाठी पाच हजार रुपये जमा होणार असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्य कार्यकारी अधिकारी सिंह यांनी, मारोडाचे सरपंच शेंडे यांनी मोफत रेतीसाठी केलेल्या पाठपुराव्याचे कौतुक केले.

तसेच मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत घरकुल लाभार्थ्यांसाठी २५ लक्ष रुपयांचा धनादेश ग्रामपंचायतीस प्रदान करण्यात आला, ज्यामुळे ४७४ लाभार्थ्यांना शासन अनुदानासोबत अतिरिक्त आर्थिक सहाय्य मिळणार आहे.या अभियानांतर्गत आयुष्मान भारत गोल्डन कार्ड शिबीर, आरोग्य तपासणी शिबीर, आधार, जॉबकार्ड व बँक खाते केवायसी शिबीर, महसूल विभागामार्फत विविध प्रमाणपत्रांचे वाटप तसेच उमेद अंतर्गत लखपती दीदींना प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक गट विकास अधिकारी किशोर शिंदे यांनी केले. संचालन विद्या कोसे यांनी तर आभार उपसरपंच अनुप नेरलवार यांनी मानले .कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पंचायत समिती मूल, ग्रामपंचायत मारोडा तसेच सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

## शेतशिवारातून पाच गायींची चोरी

•युवाराष्ट्र दर्शन उमरखेड, प्रतिनिधी, दि.१० जानेवारी

पोलीस स्टेशन अंतर्गत माळकिन्ही शेतशिवारात चोरीची घटना घडली आहे. फिर्यादी गजानन भागवत खंदारे (५०) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ८ जानेवारीच्या रात्री ते ९ जानेवारीच्या सकाळच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने त्यांच्या शेतातील खुंट्याला बांधलेली २०,००० रुपये किंमतीची लाल रंगाची गाय चोरून नेली. केवळ फिर्यादीचीच नव्हे, तर गावातील इतर लोकांच्या ५७,००० रुपये किमतीच्या ४ गायी देखील चोरट्याने लांबवल्या. एकूण ७७,००० रुपये किमतीच्या ५ गायींची चोरी झाली आहे. याप्रकरणी महागाव पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.



## अमृतराव देशमुख यांचा खरेदी विक्री संघाकडून सत्कार

•युवाराष्ट्र दर्शन महागाव, प्रतिनिधी, दि. १० जानेवारी

कापूस उत्पादनात आपल्या अनोख्या 'अमृत पॅटर्न'द्वारे क्रांती घडवून आणणारे प्रयोगशील शेतकरी अमृतराव दादाराव देशमुख (अंबोडा, ता. महागाव) यांना मराठा सेवा संघाच्या वतीने प्रतिष्ठेचा 'मराठा कृषी भूषण' पुरस्कार जाहीर झाला आहे. या यशाबद्दल महागाव तालुका खरेदी विक्री संघाच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

येत्या १२ जानेवारी २०२६ रोजी जिजाऊ सृष्टी, मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे आंतरराष्ट्रीय जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात शिवधर्म विचारपीठावर अमृतराव देशमुख यांना हा पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात येणार आहे. राज्यासह देशातील कृषी क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची दखल मराठा सेवा संघाने घेतली आहे. अमृतराव देशमुख यांनी केवळ स्वतःच्या शेतात कापूस आणि इतर पिकांचे विक्रमी उत्पादन घेतले नाही, तर त्यांनी विकसित केलेल्या 'अमृत पॅटर्न'मुळे महाराष्ट्रातील हजारो शेतकऱ्यांचे जीवन बदलले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक शेतकरी कमी खर्चात जास्त उत्पन्न घेत असून, आपली आर्थिक परिस्थिती सुधारत आहेत. शेतीकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन त्यांनी ग्रामीण युवकांना दिला आहे. अमृतरावजींच्या या यशाने महागाव तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. महागाव तालुका खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष विशाल पवार यांच्या हस्ते पुष्पगुच्छ, शाल आणि श्रीफळ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

सत्कार समारंभाप्रसंगी खरेदी विक्री संघाचे संचालक सतीश पाटील ठाकरे, व्यवस्थापक संतोष भिसे, लिपिक संतोष देशमुख, प्रमोद जाधव तसेच प्रगतशील शेतकरी अशोक तुमवार आणि शंकर ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती होती

### संक्षिप्त

#### ३७ हजार रुपये असलेली बॅग लंपास

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी महागाव, दि. १० जानेवारी

येथील एसबीआय बँकेत एका व्यक्तीचे पैसे चोरीला गेल्याची घटना ९ जानेवारी रोजी दुपारी १२:४० च्या सुमारास घडली. फिर्यादी संजय रामराव मस्के (५५) यांनी बँकेतून ३७ हजार रुपये काढले होते. त्यांनी ही रक्कम प्लास्टिकच्या पिशवीमध्ये गुंडाळून आपल्या काळ्या रंगाच्या हँडबॅगमध्ये सुरक्षित ठेवली होती. मित्राला फोन लावण्यासाठी त्यांनी बॅग खाली ठेवली असता, एका अनोळखी चोरट्याने त्यांची नजर चुकवून बॅगची चैन उघडली आणि आतील रोख रक्कम चोरून नेली. महागाव पोलिसांनी या प्रकरणी कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

# अखेर आमरण उपोषणाची सांगता

## आमदार बाळासाहेब मांगुळकर यांची मध्यस्थी : मागण्या मान्य करण्याचे आश्वासन

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ,दि.१० जानेवारी



शासकीय रुग्णालयातील रुग्णसेवा सुधारणा व मूलभूत सुविधा तात्काळ उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी रुग्णसेवक प्रवीण पंडितराव आडे यांनी सुरू केलेले आमरण उपोषण अखेर आज पाचव्या दिवशी संपले. स्व.वसंतराव नाईक शासकीय रुग्णालय,यवतमाळ येथील मुख्य प्रवेशद्वारावर सचिन मनवर यांच्या मार्गदर्शनाखाली हे आमरण उपोषण सुरू होते. रुग्णालयातील सुरक्षा रक्षकांची अरेरावी,२४ तास वैद्यकीय सुविधा उपलब्ध नसणे,औषधांचा तुटवडा,तपासणी यंत्रणांची अपुरी व्यवस्था तसेच प्रशासनाची उदासीनता या गंभीर प्रश्नांविरोधात हे उपोषण छेडण्यात आले होते. रुग्णांना रक्त तपासणी, सोनोग्राफी, औषधे, डायलेसीस, अपघात विभागातील व्हेंटिलेटर,रेबीज व सर्पदंशावरील इंजेक्शन या अत्यावश्यक सेवा २४×७ उपलब्ध कराव्यात,डॉक्टरांचे ड्युटी चार्ट दर्शनी भागात लावावेत,जन्म-मृत्यू दाखले वेळेत मिळावेत तसेच महिला व लहान मुलांसाठी स्वतंत्र सुरक्षा समिती स्थापन करावी,अशा प्रमुख मागण्या उपोषणकर्त्यांच्या होत्या. उपोषणाच्या दुसऱ्या दिवशीही स्व. वसंतराव नाईक शासकीय रुग्णालय, यवतमाळच्या शिष्टमंडळाने उपोषणस्थळी भेट देऊन चर्चा केली.या वेळी डॉ.अरविंद कुडमेथे,डॉ.चव्हाण, डॉ.राठोड यांनी उपोषणकर्त्यांशी संवाद साधला.मात्र या चर्चेतून कोणताही ठोस अथवा सकारात्मक निर्णय न निघाल्याने उपोषण पुढे सुरूच ठेवण्यात आले. अखेर उपोषणाच्या पाचव्या दिवशी यवतमाळ विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार लोकनेते बाळासाहेब मांगुळकर यांनी उपोषणस्थळी प्रत्यक्ष भेट देत मध्यस्थी केली.यावेळी प्रभारी अधिष्ठात्यांनी (सोमवार),दिनांक १२ जानेवारी रोजी सर्व विभागप्रमुखांची बैठक बोलावून सर्व मागण्या मान्य करण्याचे आश्वासन आमदार बाळासाहेब मांगुळकर यांना दिले.या लेखी व तोंडी आश्वासनानंतर आज (शनिवार),दिनांक १० जानेवारी रोजी आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्या हस्ते प्रवीण आडे यांच्या आमरण उपोषणाची सांगता करण्यात आली. यावेळी सचिन मनवर, संतोष ढवळे, प्रभारी अधिष्ठाता डॉ. चव्हाण, डॉ.आशिया, डॉ.अरविंद कुडमेथे, स्वीय सहायक शुभम लांडगे, तेजस शेंद्रे, प्रा.पंढरी पाठे, यांच्यासह विविध सामाजिक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.प्रशासनाने दिलेल्या आश्वासनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणार का,याकडे आता रुग्ण व नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## दीनदयाल सेवा प्रतिष्ठानतर्फे सर्वपक्षीय नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १० जानेवारी



सामाजिक क्षेत्रात अग्रणी असलेल्या दीनदयाल सेवा प्रतिष्ठान तर्फे नुकताच यवतमाळ नगर परिषदेच्या सर्वपक्षीय नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. दीनदयाल प्रबोधिनी निळोणा येथे संपन्न झालेल्या कार्यक्रमात मुख्य अतिथी म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय सहसंपर्क प्रमुख सुनील देशपांडे होते. यावेळी नवनिर्वाचित नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके, संस्थेच्या उपाध्यक्ष ज्योती चव्हाण, सहसचिव चंद्रशेखर बिडवाई, कोषाध्यक्ष धनंजय चौहान व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी बोलतांना सुनील देशपांडे म्हणाले, दीनदयाल संस्थेचे व्यासपीठ सर्वांसाठी खुले असून सर्वजण संस्थेच्या कार्यात सहभागी होऊ शकता. तसेच यवतमाळ शहरातील महापुरुषांचे पुतळे आपल्या सर्वांचे श्रद्धास्थान आहेत. त्यांचे जयंती - पुण्यतिथीला केवळ विशिष्ट वर्गातील त्यांच्या अनुयायांनी उपस्थित न राहता सर्वांनी उपस्थित राहून अभिवादन केले पाहिजे. पुढे बोलतांना ते म्हणाले की, आपण राजकीय क्षेत्रात कार्यरत आहात. परंतु आपल्या कार्याला सामाजिक अधिष्ठान पाहिजे. त्यामुळे आपल्या परिवारातील वाढदिवस कुठल्यातरी सामाजिक संस्थेत साजरा केला पाहिजे. कार्यक्रमाचे संचालन संस्थेचे संचालक मनीष गंजीवाले यांनी केले. संस्थेची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन परसोडकर यांनी दिली तर उपाध्यक्ष ज्योती चव्हाण यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## नगरसेवक चौधरी व मडावी यांनी पदभार स्वीकारताच विकासकामांचा प्रारंभ

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १० जानेवारी



नवनिर्वाचित नगरसेवक बिपीन चौधरी व सोनल मडावी यांनी पदभार स्वीकारताच प्रभागातील विकासकामांचा सपाटा सुरू केला आहे. अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांकडे लक्ष देत त्यांनी तातडीने कार्यवाही सुरू केली आहे. मराठी अस्मितेचे प्रतीक असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गार्डन रोड येथील पुतळ्याचे सुशोभीकरण करणे तसेच त्या परिसरात योग्य दिवाबत्तीची व्यवस्था करण्यात यावी, अशी नागरिकांची मागणी असून त्यास प्राधान्य देण्यात येत आहे. यासोबतच प्रभागातील पृथ्वीराज नगर व मातोश्री नगर येथील नळ पाइपलाईनची कामे, जांब रोड परिसरातील रस्त्यावरील दिवाबत्तीचे काम तसेच सावित्रीबाई फुले शाळेजवळील इंडस कंपनीचा अनधिकृत टॉवर त्वरित थांबविण्याबाबत नगराध्यक्ष यांना निवेदन देण्यात आले आहे.

प्रभागातील मूलभूत सुविधा, सुरक्षितता आणि सौंदर्यीकरणासाठी आवश्यक असलेल्या या सर्व कामांची अंमलबजावणी लवकरच करण्यात येईल, असे यावेळी नगरसेवकांनी सांगितले.

## बिटरगाव पोलिसांचे अवैध धंद्यांना पाठबळ?

### झोपेचं सोंग घेणाऱ्या प्रशासनाविरुद्ध महिलांचा एल्गार

•युवाराष्ट्र दर्शन ढाणकी प्रतिनिधी, दि. १० जानेवारी




बि टरगाव (बु.) पोलीस स्टेशनच्या नाकाखालीच अवैध देशी-विदेशी दारू, रासायनिक हातभट्टी आणि जुगार अड्ड्यांचा उघड माथी सुळसुळाट सुरू आहे. पोलीस प्रशासन या गंभीर प्रकाराकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत, संतापलेल्या शेकडो महिलांनी शुक्रवारी (दि.९) पोलीस ठाण्यावर धडक मोर्चा काढला.

हद्दीत खुलेआम वरळी मटका आणि ५२ पत्त्यांचे क्लब सुरू असतानाही पोलीस 'झोपेचं सोंग' का घेत आहेत, असा तिखट सवाल महिलांनी उपस्थित केला. पोलिसांच्या याच निष्क्रियतेमुळे तळीराम आणि जुगारी निर्ढावले असून, मजुरांचे कष्टाचे पैसे आणि विद्यार्थ्यांचे भविष्य उद्ध्वस्त होत आहे. "पोलीस स्टेशन असूनही जर गुन्हेगार बिनधास्त असतील, तर खाकीचा दरारा उरला कुठे?" अशा शब्दांत महिलांनी पोलिसांच्या भूमिकेवर कडक ताशेरे ओढले.

दारूच्या व्यसनापोटी पुरुष घरातील दागिने आणि धान्य विकत आहेत, महिलांना मारहाण होत आहे. या सर्व प्रकाराची माहिती असूनही कारवाई होत नसल्याने पोलिसांच्या हेतूवर संशय व्यक्त केला जात आहे. ठाणेदार शिंदे यांना निवेदन देताना महिलांनी ठणकावून सांगितले की, "कारवाई होत नसेल तर आम्ही अधिक तीव्र आंदोलन करू." आता पोलीस या अवैध धंद्यांना आळा घालतात की केवळ आश्वासनांची बोळवण करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## ऑपरेशन प्रस्थान अंतर्गत क्रिकेट सामने उत्साहात

•युवाराष्ट्र दर्शनप्रतिनिधी, यवतमाळ, दि. १० जानेवारी



यवतमाळ जिल्हा पोलीस दल तर्फे सुसज्ज मैदान व निसर्गरम्य वातावरण मधे दि. 7 जानेवारी बुधवार रोजी ऑपरेशन प्रस्थान अंतर्गत व वर्धापन दिन सप्ताह निमित्त एक दिवसीय क्रिकेट सामन्याचे आयोजन खेळीमेळीच्या वातावरणात पळसवाडी ग्राउंड येथे करण्यात आले होते.

या सामन्यामध्ये प्रमुख संघ म्हणून भाग घेणार पोलीस अधीक्षक टीम, पत्रकार संघ, महसूल विभाग व वकील संघ यांचे मधे घेण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून लाभलेले यवतमाळचे जिल्हाधिकारी विकास मीना, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता व प्रमुख अतिथी म्हणून लाभलेले यवतमाळचे जिल्हा मुख्य न्यायाधीश, शेखर मुनघाटे, बघेल प्रमुख उपस्थिती म्हणून अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, ट्राफिकचे पोलिस निरीक्षक ज्ञानोबा देवकते व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरिक्षक सतीश चवरे , शहर पोलिस निरिक्षक रामकृष्ण जाधव, बार असोसिएशन चे अध्यक्ष संजय जैन, पत्रकार संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत राऊत व इतर अधिकारी व कर्मचारी खेळाडू वर्ग यांचा उपस्थितांमध्ये वर्धापन दीन सप्ताह यशस्वी पार पडला.. कार्यक्रमाचे संचालन ज्ञानोबा देवकते यांनी केले तर कंमेंटटर म्हणून, API रोहित चौधरी, पवन राठोड व मनीष गावंडे यांनी पार पाडले. सामन्याचे प्रथम पारितोषिक महसूल विभाग तर द्वितीय पारितोषिक पोलीस अधीक्षक संघ यांनी पटकावले. तृतीय पारितोषिक वकील संघ व चतुर्थ पारितोषिक पत्रकार संघ यांनी पटकावले. संपूर्ण सामन्यांमध्ये सर्वाधिक विकेट घेणारे बेस्ट बॉलर मॅन ऑफ टूर्नामेंट चे पारितोषिक म्हणून अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांना देण्यात आले तर बेस्ट बॅट्समनचे पारितोषिक म्हणून महसूलचे गजानन चव्हाण यांना देण्यात आले... कार्यक्रमाचे नियोजन कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण जिल्हा पोलीस दल तर्फे करण्यात आले होते..

## स्त्री-शिक्षणाच्या क्रांतीकारी शिक्षिका फातिमा शेख यांना विनम्र अभिवादन

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, ढाणकी, दि. १० जानेवारी



भारतातील पहिल्या मुस्लिम शिक्षिका आणि सावित्रीबाई फुले यांच्या खांद्याला खांदा लावून स्त्री-शिक्षणाची मशाल पेटवणाऱ्या फातिमा शेख यांच्या जयंतीनिमित्त ढाणकी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात अभिवादन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. समाजसेवा आणि शिक्षण क्षेत्रात फातिमा शेख यांचे योगदान अद्वितीय आहे. ज्या कठीण काळात महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांना विरोधाचा सामना करावा लागला, त्या काळात फातिमा शेख यांनी त्यांना केवळ राहण्यास जागाच दिली नाही, तर स्वतः शिक्षिका होऊन मुलींना शिकवण्याचे धाडस दाखवले. त्यांच्या या क्रांतीकारी कार्याची प्रेरणा आजच्या पिढीला मिळावी, या हेतूने या गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या अभिवादन कार्यक्रमात राष्ट्रीय मुस्लिम मोर्चा, भारतीय युवा मोर्चा, बुद्धिस्ट इंटरनॅशनल नेटवर्क आणि लहुजी क्रांती मोर्चा यांसह अनेक सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. फातिमा शेख यांच्या गौरवशाली इतिहासावर मान्यवरांनी यावेळी प्रकाश टाकला. या सोहळ्याला जब्बार भाई, शेख इरफान मिलिंद चिकाटे, अमीन भाई, शाहरुख भाई, अमोल पाटील, स्वप्निल चिकाटे, प्रकाश कांबळे, दिलीप कळाले, राजू पाटील, मिलिंद कदम यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. उपस्थित सर्वांनी फातिमा शेख यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन केले.

# पत्रकार दिनाचे औचित्य साधित विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व साहित्याचे वाटप

•युवाराष्ट्र दर्शन तालुका प्रतिनिधी दिग्रस, दि. १०



निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघटनेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पत्रकार दिनाचे औचित्य साधून सामाजिक बांधीलकी जपण्यात आली. दिग्रस तालुक्यातील कांदळी येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय गणवेश आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप करून आदर्शवत पत्रकार दिन साजरा करण्यात आला.यावेळी दिग्रस पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक वैद्यनाथजी मुंडे यांनी पत्रकाराचे कार्य समाज हितासाठी खूप मोलाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

या विशेष कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार होते. प्रमुख पाहुणे म्हणून दिग्रसचे नायब तहसीलदार सुधाकर राठोड, दिग्रस पोलीस स्टेशनचे ठाणेदार वैजनाथ मुंडे, जिल्हा अध्यक्ष लक्ष्मण टेकाळे, जिल्हा संघटक पुरूषोत्तम कुडवे यांची उपस्थिती होती. या मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले. पत्रकारितेसोबतच सामाजिक बांधिलकी केवळ बातम्यांमधून समाजाचे प्रश्न मांडण्यापुरते मर्यादित न राहता, पत्रकार संघाने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावण्याचे काम केले आहे. "शिक्षण हा मुलांचा हक्क आहे आणि त्यात परिस्थितीमुळे अडथळा येऊ नये, या भावनेतून हा उपक्रम राबवण्यात आला," असे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले. शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना नवीन शालेय गणवेश देण्यात आले. वह्या, पेन आणि इतर आवश्यक साहित्याचे वाटप करून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्यात आला.उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व सांगून उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या उपक्रमामुळे शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक आणि ग्रामस्थांनी निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघटनेचे आभार मानले आहेत. कार्यक्रमाला तालुका अध्यक्ष लुकमान खान, लक्ष्मण चव्हाण, सुनील हिरास, संजय राऊत, संतोष कदम, उमेश भटकर, उमेश साखरकर, अनिकेत सूर्यवंशी व संघटनेचे पदाधिकारी, पत्रकार बांधव आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. तदनंतर लगेच दिग्रस विश्रामगृह येथे संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांच्या उपस्थितीत राजपाल बनसोड,यादव गावंडे,विलास निकम,सुनील साबळे, रामदास मागुळकर, प्रफुल व्यवहारे,ज्ञानराज ढोरे, अक्षय काळबांडे यांनी निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघटनेत प्रवेश केला.



## महाजन कॉलेज येथे गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १० जानेवारी

सं.गा.बा. विद्यापीठ अमरावती च्या बीकॉमच्या गुणवत्ता यादीत चमकलेल्या महाजन कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजी यवतमाळ विद्यार्थिनी कु. नयना मांढरे व कलश अग्रवाल या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे संस्थापक सचिव सदाशिवराव महाजन व प्राचार्य आशिष होरे यांनी विद्यार्थ्यांचे त्यांच्या परिश्रमाबद्दल कौतुक केले तसेच पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी प्रा. अजिंदर चावला, प्रा. डॉ. स्वाती सरकटे, प्रा. नरेंद्र इंगळे, प्रा. पल्लवी वरकड, प्रा अंजली पाटील, प्रा. नरेंद्र पंडित, प्रा. सोनल शेलारे, प्रा. प्रिया नखाते, प्रा. डॉ. अभिरुची शेजुळे, प्रा. दिपाली शिंदे, प्रा. प्रज्वल गोरे, प्रा. ओम पाळेकर, प्रा. सुहास चौधरी, कार्यालयीन अधीक्षक गजानन सामृतवार, स्वप्नील तिजारे, प्रा. केतकी खडककार, प्रा. साक्षी मिर्झापूरे, रवि स्वातीताई, हर्षताई व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

युवाराष्ट्र दर्शन
# भंडारा जिल्हा
रविवार दि.११ जानेवारी २०२६

## गर्रा बघेडा येथे तीन दिवसीय ईनामी बैल शंकर पटाचे आयोजन

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**तुमसर :** तालुक्यातील गर्रा बघेडा येथे ९ जानेवारीपासून तीन दिवसीय पारितोषिक विजेत्या शंकर पटाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच वसंत तरटे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष उपसरपंच दीपक चौधरी, प्रमुख उपस्थित गर्रा जिल्हा परिषद क्षेत्राचे जिल्हा परिषद सदस्य संदीप ताले, पंचायत समिती सदस्य राजेश ठाकूर, गुरुदेव भोंडे, माजी उपसरपंच अशोक ठाकूर, रामेश्वर रहांगडाले, पोलीस पाटील सुसुरडोह पुष्पलता भलावी, पोलीस पाटील गर्रा बघेडा तालीफ सिद्दिकी, लाईनमन विलास उईके, अनिल चौधरी, सचिन गणेरकर, पद्माकर मुगुसमारे, गोपीचंद गायकवाड, नामदेव चौधरी, जुगाराम पटले, संतोष रहांगडाले बालू चौधरी, आणि सर्व गावकरी यांच्या उपस्थित शंकर पटाचे उद्घाटन पार पडले.



युवाराष्ट्र दर्शन
पत्रकार होण्याची सुवर्णसंधी
दैनिक युवाराष्ट्र दर्शन
वृत्तपत्राकरीता भंडारा जिल्ह्यातील लाखनी, लाखांदूर, पवनी येथे तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे आहे. तसेच गाव पातळीवर वार्ताहर नियुक्त करणे आहे.
संपर्क मो.: ९९२३०७०३९२

# वाघाच्या हल्ल्यात दोन बैल ठार

## हरदोली (सि.) येथील घटना



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**सिहोरा :** पोलीस स्टेशन सिहोरा अंतर्गत असलेल्या हरदोली (सि.) येथे शेतात बांधलेल्या २ बैलांना वाघाने ठार केल्याची घटना दि.९ जानेवारी रोजी शुक्रवारला सकाळी ६ वाजेच्या सुमारास उघडकीस आली असून कैलास मारुती पटले असे नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांचे नाव आहे.

नेहमी प्रमाणे कैलास मारोती पटले हे गावाशेजारी असलेल्या शेतात गुरांच्या गोठ्यात त्यांनी आपले बैल बांधले होते. मात्र गोट्यात रात्रीच्या सुमारास वाघाने दोन बैलांना ठार केले. शेतकरी दररोज प्रमाणे बैलांना गोठ्यातून बाहेर काढण्यासाठी शेतावर गेले असता, दोन्ही बैल रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे दिसले. दोन्ही बैलांना वाघाने ठार मारल्याचे लक्षात येताच त्यांनी आरडा ओरड केली. यात शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. परिसरात वाघाचा वावर असल्यामुळे हरदोली-सिहोरा परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून संबंधित वन विभागाने व शासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्याला तात्काळ आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

### मॅगनीज चोरट्यांना रंगेहात पकडले

**भंडारा :** तुमसर तालुक्यातील गोबरबाही पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना डोंगरी ते पवनारखरी मार्गावर प्लास्टिकच्या पोत्यांमधून मॅगनीजची चोरटी वाहतूक करीत असताना पकडण्यात आले. सदर कारवाईत १४३० किलो मॅगनीज जप्त करण्यात आला. त्याची किंमत ७१ हजार ५०० रुपये सांगण्यात येते. पोलीस शिपाई मुकेश गायधने यांच्या तक्रारीवरून गोबरवाही पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# घोरपड, धुसाळा परिसरात दोन दिवसांपासून बिबट्याचा वावर

## ■ परिसरातील नागरिक दहशतीत ■ वनविभागाच्या सतर्क राहण्याच्या सूचना

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा :** मोहाडी तालुक्यातील जिल्ह्याच्या टोकावर असलेल्या घोरपड आणि धुसाळा परिसरात मागील दोन दिवसांपासून बिबट्याच्या वावर असून एका हरणाची व एका रानडुकराची शिकार झाल्याने परिसरातील नागरिकांत भीतीचे वातावरण तयार झाले आहे. जांब कांद्री वनपरिक्षेत्रातील सहवनक्षेत्र आंधळगाव व नियतक्षेत्र हरदोली अंतर्गत येणाऱ्या बोन्दरी, घोरपड व धुसाळा परिसरात वन्यप्राणी बिबट्याच्या अस्तित्वाचा संशय बळावला असून, त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. शेतशिवारात बिबट्याने हरणाची शिकार केल्याची घटना उघडकीस आल्याने वनविभागाने तातडीने सतर्कतेचा इशारा दिला आहे.




दिनांक ८ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजताच्या सुमारास बोन्दरी येथील शेतकरी संतोष कोहापरे यांच्या शेतात वन्यप्राणी बिबट्याने हरणाची शिकार केल्याची माहिती वनविभागाला प्राप्त झाली. माहिती मिळताच सहवनक्षेत्र हिवरा व आंधळगाव येथील वन कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. घटनास्थळी जमिनीवर मृत चितळ (हरण) आढळून आले असून, त्यावर झाडावर चढून शिकारीसाठी ओढल्याचे स्पष्ट दिसून आले.

तपासणी दरम्यान परिसरात बिबट्याचे पायांचे ठसेही आढळून आले. त्यामुळे या भागात बिबट्याचा वावर असल्याची शक्यता अधिक झाली आहे. या घटनेनंतर बोन्दरी, घोरपड व धुसाळा परिसरात वनविभागाकडून शोधमोहीम राबविण्यात येत असून, जंगलालगतच्या शेतशिवारात विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. वनकर्मचाऱ्यांकडून गस्त वाढविण्यात आली असून, बिबट्याच्या हालचालींवर बारकाईने नजर ठेवली जात आहे.

या घटनेमुळे परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक शेतकरी रात्रीच्या वेळी शेताकडे जाणे टाळत आहेत.

वनविभागाने गावकऱ्यांना सतर्कतेचा इशारा देत रात्री एकटे फिरू नये, शेतात काम करताना आजूबाजूला लक्ष ठेवावे, तसेच लहान मुले व वृद्ध व्यक्तींवर विशेष लक्ष ठेवण्याचे आवाहन केले आहे. कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास तात्काळ वनविभागाशी संपर्क साधण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अफवा पसरवू नयेत, असेही स्पष्टपणे सांगण्यात आले आहे.

दरम्यान, जांबकांद्री वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी स्वतः घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना राबविण्यात येत असून, बिबट्याचा वावर निश्चित झाल्यास पुढील योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यात येत असून, परिस्थिती पूर्णतः नियंत्रणात ठेवण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे वनविभागाने सांगितले आहे.

शेतशिवारात घडलेल्या या घटनेमुळे संपूर्ण परिसरात अस्वस्थता पसरली असून, नागरिकांकडून वनविभागाने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे. विशेषतः शाळकरी मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, पालक वर्ग अधिकच चिंतेत आहे.

# धोप जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा एक आदर्श ! जिल्हाधिकारी सावनकुमार

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**मोहाडी :** भंडारा जिल्हाधिकारी सावनकुमार यांनी मोहाडी तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा धोप शाळेची पाहणी केली. शाळेतील सुशोभन, शालेय परसबाग, शालेय स्वच्छता , संगणक कक्ष, व सुंदर शालेय परिसर बघून जिल्हाधिकारी सावनकुमार यांनी शाळेचे भरभरून कौतुक केले व शाळेतील विकासात्मक कामे लोकसहभागातून निरंतर सुरू ठेवण्याचे आवाहन ग्रामवासियांना केले.



जिल्हाधिकारी महोदय पुढे म्हणाले की, ही शाळा एक आदर्श शाळा आहे आणि इतर शाळांनी अशा शाळेचे नक्कीच अवलोकन करावे. आपल्या जिल्ह्यातील मराठी शाळा टिकवायच्या आहेत तर धोप शाळे कडून आदर्श घ्यावा असे त्यांनी ह्यावेळी प्रतिपादित केले.

ह्या भेटी क्षणी जिल्हाधिकारी यांचेसोबत तुमसर उपविभागीय अधिकारी अंबादे , तहसीलदार मोहाडी, पंचायत समिती सभापती जगदीश्वर शेंडे, खंडविकास अधिकारी मोहाडी सिंगनजुडे, मोहाडी तालुक्यातील सर्व विस्तार अधिकारी , ठाणेदार राठोड हे उपस्थित होते.

ह्याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक ह्यांनी सांगितले की आमच्या शिक्षकांनी प्रचंड परिश्रम घेऊन शाळा सुजलाम , सुफलाम करण्याचा प्रयत्न केला. शाळेचे शिक्षक श्री. एम. एन. शहारे सर, पदवीधर शिक्षक चाचेरे सर, पदवीधर शिक्षक गुणवंत शेंडे, सहाय्यक शिक्षक नीलिमा मसराम मॅडम, सहायक शिक्षक कु. कोडवते मॅडम , शिक्षण सेवक ईश्वरकर मॅडम ह्यांच्या पुढाकाराने हे सर्व शक्य झाले आहे.

याप्रसंगी सरपंच सीमाताई मंढारी , उपसरपंच श्यामभाऊ शेंडे ,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष कमलेश्वर सपाटे, शाळा व्यवस्थापन समिती सर्व सदस्य, ग्रामपंचायतचे सदस्य आणि प्रतिष्ठित ग्रामस्थ आणि मोठ्या संख्येने पालक वर्ग उपस्थित होते.

# सार्वजनिक वाचनालयाच्या भजन सप्ताहाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा :** सार्वजनिक वाचनालय भंडाऱ्याच्या भजन सप्ताहाला भजनी मंडळांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या भजन सप्ताहाचा समारोपीय कार्यक्रम १२ जानेवारीला आयोजित करण्यात आला आहे.



या अभिनव भजन सप्ताहाचे उद्घाटन भंडारा नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष सौ.मधुरा मदनकर यांनी केले. उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी देवलापार गो-अनुसंधान केंद्राचे उपाध्यक्ष संजय एकापुरे हे होते. आतापर्यंत झालेल्या या भजन सप्ताहात जय श्रीराम मंडळ भंडारा, माऊली भजन मंडळ भंडारा, माँ शारदा भजन मंडळ भंडारा, जयकारा अंबिका भजन मंडळ भोजापूर, नवशक्ती भजन मंडळ खोकरला, जान्हवी भजन मंडळ भंडारा, चैतनेश्वर भजन मंडळ भंडारा, गुरुदेव सेवा मंडळ भजन मंडळ गणेशपुर, गुरुदेव सेवा महिला भजन मंडळ गणेशपुर, बासुरी भजन मंडळ भंडारा, सद्गुरु लहरी भजन मंडळ भंडारा, माँ आदिशक्ती भजन मंडळ भंडारा, मातृशक्ती भजन मंडळ भंडारा, नवशक्ती भजन मंडळ गोपेवाडा, विदेही मोतीराम बाबा भजन मंडळ गोपेवाडा, गौरी भजन मंडळ भंडारा, श्रीकृष्ण भजन मंडळ भंडारा, वारकरी भजन मंडळ भंडारा, शारदा भजन मंडळ भंडारा यांनी उत्कृष्ट भजनांचे सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या भजन सप्ताहाला संस्कार भारतीचे दत्ता दाढी, सिद्धयोग साधना केंद्राचे संयोजक डॉ. नरेंद्र व्यवहारे,इशिता भरतनाट्यमच्या सौ.चंदा मुरकुटे, भंडारा वारकरी मंडळाचे नितीन गायधने, लायन्स क्लबचे डिस्टिक्ट गव्हर्नर भरत भलगट, सागर फार्मासिटीकलचे निकेत क्षीरसागर, सामाजिक कार्यकर्ता सौ.वसुधा मेघरे व भंडारा शहरातील नामवंत दैनिकांचे जिल्हा प्रतिनिधी यांनी भेट देऊन या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले. सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष धनंजय दलाल व कार्यवाह प्रा. सुमंत देशपांडे यांच्या नेतृत्वात सुरू असलेल्या या भजन सप्ताहाचा समारोपीय कार्यक्रम १२ जानेवारीला संध्याकाळी ६.०० वाजता इंद्रराज सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. याप्रसंगी सहभागी भजनी मंडळांना सन्मानचिन्ह सर्व सहभागी कलावंतांना प्रशस्तिपत्र देऊन गौरविले जाणार आहे. याप्रसंगी शहरातील नागरीकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# जिल्हा परिषद शाळेत मुलांना शालेय साहित्य वितरण



## शासनमान्य महाराष्ट्र पत्रकार संघाचे आयोजन

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**साकोली :** शहरातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्र. ०२ पंचशील वार्ड येथे शासन मान्य महाराष्ट्र पत्रकार संघ वतीने ( शनि. १० जाने.) ला विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी शिक्षकृंद आणि साकोली येथील पत्रकार उपस्थित होते.

नुकत्याच झालेल्या पत्रकार दिनाचे औचित्य साधून हे आयोजन जि. प. प्राथ. शाळा क्र. ०२ मधील विद्यार्थ्यांना नोटबुक्स आणि पेनांचे वितरण करण्यात आले. या प्रसंगी अतिथी मुख्याध्यापक एम. व्ही. बोकडे, महाराष्ट्र पत्रकार संघाचे भंडारा जिल्हा उपाध्यक्ष डी. जी. रंगारी, तालुका पत्रकार संघ अध्यक्ष राजेश बैस, प्रेस संपादक संघाचे जिल्हाध्यक्ष आशिष चेडगे, एशियन न्यूजच्या वाचक शितल नागदेवे, पत्रकार संतोष कोरे, प्रकाशराणा मेश्राम, सहाय्यक शिक्षक यु. जी. भस्मे, शिक्षिका लता इळपाते, पल्लवी लुथडे, स्वयंसेवी शिक्षिका पिंकी क्षिरसागर हे उपस्थित होते. यावेळी या शाळेतील भव्य परीसरात नियमित स्वच्छता होण्यासाठी आणि बालोद्यान साहित्य लावण्यासाठी नगरपरिषदेकडे तातडीने पाठपुरावा करण्यात येईल असे याप्रसंगी सर्व पत्रकारांनी सांगितले. कार्यक्रमात संचालन डी. जी. रंगारी यांनी तर आभार शिक्षिका पल्लवी लुथडे यांनी मानले.

## आज शासकीय योजनांचा महामेळावा

**भंडारा :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने ११ जानेवारी २०२६ रोजी लाखनी येथे नागरिकांसाठी शासकीय सेवा व योजनाचा महामेळावा आयोजित करण्यात आला आहे. या महामेळाव्याचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती तथा भंडारा जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती महेंद्र चांदवाणी यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी जिल्हाधिकारी सावन कुमार, पोलीस अधीक्षक नुरुल हसन व इतर मान्यवर उपस्थित राहतील.

# आठ गावाच्या पुनर्वसनाचा प्रश्न तात्काल मार्गी लावा-आ.भोंडेकर

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा:** उमरेड -कऱ्हांडला- पवनी वन्य जीव अभयारण्य अंतर्गत पवनी तालुक्यातील आठ गावांतील पुनर्वसन प्रश्न तात्काळ मार्गी लावण्याचे निर्देश आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी दिले. पवनी तहसिल कार्यालय येथे आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. उपविभागीय अधीकारी माधुरी तिखे,पवनी तहसीलदार व विविध विभागाचे अधिकारी यावेळेस उपस्थित होते.



बैठकीत प्रकल्पांतर्गत गावनिहाय पुनर्वसन पॅकेज रचना, जमीन मोजणी, पुनर्वसन प्रक्रिया, नुकसानभरपाई तसेच इतर प्रशासकीय कामे ३१ मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करा असे आदेश तहसीलदार यांना दिले.

मुख्यमंत्री बळीराजा शेत पांदण योजना व मातोश्री पांदण योजना अंतर्गत सुमारे १७०० किमीचा डीपीआर तयार करण्यात आलेला असून, त्यामध्ये भंडारा ९४ गावे तसेच पवनी तालुक्यातील ७९ गावांचा समावेश असल्याची माहिती देण्यात आली.ग्रामीण भागातील नागरिकांच्या सोयीसाठी'गाव तिथे पांदण रस्ते' योजना प्रभावीपणे राबविण्यात याव्यात, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या. सर्व संबंधित विभाग व यंत्रणांमध्ये समन्वय साधून प्रकल्पबाधित नागरिकांचे प्रश्न मार्गी लावण्याचा उद्देश असून, नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने पुनर्वसन, नुकसानभरपाई व विकासकामांची कार्यवाही पारदर्शकपणे व वेळेत पूर्ण करण्यावर भर द्यावा, असे निर्देश आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी दिले.

## लाखनी बसस्थानक परिसरात स्वच्छता मोहिम व वाहतुक नियम संबंधी कार्यक्रम



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**लाखनी :** रस्ते वाहतूक अपघातामध्ये मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या स्मरणार्थ लाखनी बसस्थानक परिसरात सिद्धार्थ विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय सावरी /मुरमाडी च्या वतीने स्वच्छता मोहीम व वाहतूक नियमांचा कार्यक्रम घेण्यात आला.

याप्रसंगी नितीन शिवनकर पीएसआय गडेगांव पथक, एस. ए. लोगडे , एच. एच. मेमन , कु. समिक्षा जावेकर कनिष्ठ अभियंता भंडारा, एस.एम. गिऱ्हेपुंजे वाहतूक नियंत्रक बस स्थानक लाखनी, सुरेश बावनकुळे सामाजिक कार्यकर्ता लाखनी यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी मान्यवरांनी मोलाचे मार्गदर्शन केले व परिसर स्वच्छ ठेवण्याची प्रतिज्ञा घेतली.

## पहेला-आंभोरा रस्ता बनला 'मृत्यूचा सापळा'

**भंडारा :** तालुक्यातील पहेला ते आंभोरा हा अत्यंत महत्त्वाचा व वर्दळीचा रस्ता गेल्या तीन वर्षांपासून दुर्लक्षित राहिल्याने नागरिकांसाठी जीवघेणा ठरत आहे. रस्त्यावरील मोठमोठे खड्डे, उखडलेले डांबर, चिखलमय पृष्ठभाग व प्रचंड धूळ यामुळे हा रस्ता अक्षरशः 'मृत्यूचा सापळा' बनला आहे.

# ग्रामीण रुग्णालयात हायड्रोसिल हर्निया शस्त्रक्रिया शिबिर यशस्वी



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**मोहाडीः** हत्तीरोग विभागाच्या पुढाकाराने मोहाडी शासकीय ग्रामीण रुग्णालयात तालुक्यातील हर्निया व हायड्रोसिल रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत हत्तीरोग विभागाच्या माध्यमातून शासकीय ग्रामीण रुग्णालय मोहाडी येथे हायड्रोसिल व हर्निया रुग्णांच्या शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिरासाठी रुग्णांची तपासणी व अन्य प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ९ जानेवारीला हर्निया व हायड्रोसिल शस्त्रक्रियांचे आयोजन करण्यात आले होते.

शस्त्रक्रिया शिबिर जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.गजभिये, मोहाडीच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. निशा भावसार,जिल्हा हत्तीरोग अधिकारी डॉ. शंकर कैकाडे यांच्या मार्गदर्शनात तज्ञ शल्यचिकित्सक डॉ.अरुण नडंगे,डॉ. सुमित भुरे, डॉ. वृषाली जाधव, भूलतज्ञ डॉ.पूजा बारई,डॉ.फाहिदा अरक्कल या चमूने २१ रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करुन पूर्ण केले.

हे आरोग्य शिबीर यशस्वी करण्यासाठी शासकीय ग्रामीण रुग्णालय मोहाडीचे वैद्यकीय अधिकारी डॉ.निंबेकर, डॉ.गजभिये,डॉ.सोनेवाने,डॉ.ईशिका गोंडाणे,डॉ.मते, डॉ.गौरशेट्टी डॉ.शिल्पा तुमसरे, अधिपरिचारिका श्रद्धा पानतावणे, कीर्ती शर्मा,प्रज्ञा पानतावणे, संगीता नानकुरे,जयश्री मते, पायल जुमळे,आरोग्य निरिक्षक राजू देशमुख, आरोग्य मित्र यशवंत निपाने, आरोग्य कर्मचारी सुनील झाडेकर तसेच मोहाडी ग्रामीण शासकीय रुग्णालयाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले .

